पीएच.डी.संशोधन आराखडा

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पोलिसांचे बदलते स्वरूप:एक ऐतिहासिक अवलोकन

(विशेष संदर्भ-महाराष्ट्र पोलीस)

(कालखंड १९४७ ते २०१०)

Submmited by

Jyoti keshavrao Kadam

(M.A. M.Phil. Histroy)

Nanded, Maharashtra

Guide

Pro.Dr. S.B.Dhengale

Yashwant Mahavidyalay,Nanded

Submmited to

Swami Ramanand Teerth Marathwada University

Nanded

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पोलिसांचे बदलते स्वरूप:एक ऐतिहासिक अवलोकन (विशेष संदर्भ-महाराष्ट्र पोलीस)

प्रस्तावना:

पृथ्वी तलावर मानवीसृष्टी निर्माण झाल्यापासून ते आजचा आधुनिक समाज अस्तित्वात येईतो अनेक बदल घडून गेले आहेत. या बदलांचा अभ्यास करण्याचे कार्य इतिहास करत असतो. मानवी जीवन अस्तित्वात आल्यापासून व्यक्ती, समाज, सामाजिक संस्था, समाजातील आंतरसंबंध, रूढी-परंपरा, जीवनशैली इ. अनेक गोष्टींमध्ये बदल घडून आलेले आहेत. व्यक्तींचा मिळून समाज बनतो. समाजातील भाव-भावना, क्रिया-प्रतिक्रिया, आंतरक्रिया इ. नियंत्रित करण्याची गरज प्राचीन काळापासून निर्माण झालेली आहे. त्यातील एखादी व्यक्ती समाजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असे.

राजाचे पूर्ववैदिक काळातील स्वरूप बदलत जावून हळूहळू राजा म्हणजे इश्वरीय रूपच होय अशी प्रतिमा जनमानसात रूढ होत गेली. राजाला पुरोहित आणि सेनापती हे दोन प्रमुख अधिकारी मदत करत. गुप्तचर आणि संदेशवाहक देखील त्याच्या सेवक वर्गामध्ये असत. आजच्या आधुनिक समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या पोलीस यंत्रणेचे हे बीज होते, असे म्हणायला हरकत नाही. या बीजाचे रूपांतर पुढील अनेक वर्षांमध्ये होत जावून आजची पोलीस यंत्रणा अस्तित्वात आलेली दिसते. पोलिसांच्या इतिहासाची सुरूवात ऋग्वेदकाळापासून झालेली दिसते. खरोखरीच इतिहास म्हणजे वर्तमानकाळ आणि भूतकाळ यामधील कधीही न संपणारा संवाद होय.

संशोधनाची गरज:

सद्रक्षणाय, खलनिग्रणाय हे ब्रीदवाक्य असणाऱ्या पोलीस खात्याची समाजामध्ये विशिष्ट अशी प्रतिमा आढळते. चांगल्या, भल्या माणसांचे व मूल्यांचे रक्षण करणे आणि “नाठाळाचे माथी हाणू काठी” असे म्हणणाऱ्या तुकारामासारखे वाईटांचे व अनिष्ट प्रवृत्तींचे निर्दालन करणे अशी दुहेरी जबाबदारी पार पारडणाऱ्या पोलीस विभागाकडे मात्र समाजाचे आणि एकूणच व्यवस्थेचे दुर्लक्ष झालेले आहे.

जगाचे स्वरूप सातत्याने बदलत आहे. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या लाटेवर स्वार झालेल्या या चालू शतकाने तर जीवनाची व्याख्याच पार बदलून टाकली आहे. आधुनिक सोयी-सुविधांनी गुन्हेगारीलाही खतपाणी घालण्याचे नव्हे तर गुन्हेगारीचा महावृक्ष करण्याचे काम केले आहे. गुन्हेगारीची ही पाळेमुळे खणून काढून त्यावर घाव घालण्याचे आव्हान आजच्या पोलीस व्यवस्थेसमोर आहे. पारंपरिक कामकाज पध्दतीला फाटो देवून नव्याने; नवीन गोष्टींची पायाभरणी करून नाविन्यपूर्ण पध्दतीने पोलिसिंगची संकल्पना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

एकंदरीत या पार्श्वभूमीवर ब्रिटीश काळामध्ये स्थापन झालेल्या पोलीस व्यवस्थेचे नेमके स्वरूप व कार्य कसे होते? आणि स्वातंत्र्योत्तर काळात त्याचे स्वरूप कस-कसे बदलत गेले? यापेक्षा अधिक बदलांची पोलीस खात्यासाठी आवश्यकता आहे का? ब्रिटीशकालीन पोलिसिंग आजच्या स्वातंत्र्योत्तर भारतामध्येही राबवली जाते ती कालोचित आहे का? या प्रश्नांच्या उत्तराच्या शोधासाठी प्रस्तुत संशोधकाच्या मनात सदरील विषयाने उत्सुकता निर्माण केली आहे.

..पहा पृष्ठ 2

विषय निवडीचा हेतू:

१. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापित झालेल्या पोलीस व्यवस्थेचे प्रारंभीचे स्वरूप व कार्य यांचा थोडक्यात परामर्श घेणे.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय पोलिसांचा, विशेषत: महाराष्ट्र पोलिसांचा अभ्यास करणे.

३. ब्रिटीशांनी पोलिसांबाबत आमलात आणलेल्या अनेक बाबी स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय पोलीस व्यवस्थेचा भाग आहेत का याचा अभ्यास करणे.

४. स्वातंत्र्योत्तर काळातील पोलिसांसमोरची आव्हाने कोणकोणती आहेत आणि त्यानुसार महाराष्ट्र पोलिसांचे बदलते स्वरूप कसे आहे याचा शोध घेणे.

५. महाराष्ट्र पोलीस दलात स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कोणत्या सुधारणा झाल्या याचा शोध घेणे.

६. सांप्रत काळात ब्रिटीशकालीन पोलीस व्यवस्थेतील काही पध्दती चालू ठेवणे कितपत योग्य आहे याचा परामर्श घेणे.

'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पोलिसांचे बदलते स्वरूप: एक ऐतिहासिक अवलोकन (विशेष संदर्भ महाराष्ट्र पोलीस) *(कालखंड इ.स. १९४७ ते २०१०)* या प्रस्तुत संशोधन प्रबंधाचे क्षेत्र हे संपूर्ण भारतभर विखुरलेले असले तरी महाराष्ट्राचा (महाराष्ट्र पोलिसिंगचा) अभ्यास करण्यात येईल. तत्कालीन मुंबई इलाखा हा ब्रिटीश आमदानीत महत्वपूर्ण राजकीय स्थान प्राप्त झालेला इलाखा होता. मुंबई प्रांत हा उत्तर कोकणचाच भाग गणला जात असे. तेराव्या शतकापर्यंत हा प्रांत उत्तर कोकणच्या राजाच्या अधिपत्याखाली होता. सिलहरच्या काळापर्यंत ठाणे व एलिफंटा या राजधान्या होत्या. नंतर उत्तर कोकणचा प्रांत मुस्लिम राजकर्त्यांच्या अधिपत्याखाली आला. त्यांनी माहिमला राजधानी केले. १५३४ मध्ये गुजरातचे सुलतान बहादुरशहा यांनी उत्तर कोकण व मुंबईची बेटे पोर्तुगीजांच्या ताब्यात दिली. इंग्लंडचा राजपुत्र चार्ल्स दुसरा व पोर्तुगालची राजकन्या कथरिना यांचा विवाह २३ जुन १६६१ मध्ये पार पडला. त्यावेळी पोर्तुगीजांनी मुंबई बेट हे ब्रिटीश राज्यकर्त्यांना भेट म्हणून दिली. ब्रिटीशांनी या ठिकाणी व्यापारी केंद्र व सुरक्षादल आणले. विविध भागात पोलीसस्थानके स्थापन केली. त्यामुळे मुंबई आणि उर्वरीत महाराष्ट्र हे भौगोलिक क्षेत्र दोन्ही काळातील पोलिसिंगच्या संदर्भाने अभ्यासणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत संशोधन प्रबंध हा संदर्भ संशोधन लेखनाचा भाग असून याचा कालखंड भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून म्हणजे इ.स. १९४७ ते स्वातंत्र्योत्तर काळातील इ.स. २०१० पर्यंतचा अर्थात इ.स. २० वे ते २१ वे शतक हा कालखंड आहे. या प्रबंधात भारतीय पोलिसिंगच्या स्थापनेच्या संक्षिप्त इतिहासापासून ते स्वातंत्र्योत्तर काळातील आधुनिक पोलीस व्यवस्थेचा अभ्यास केला जाईल. स्वातंत्र्यपूर्व काळातील पोलीसव्यवस्थेमधील कोणकोणत्या बाबी स्वातंत्र्योत्तर काळातही टिकून आहेत, त्यांच्यात बदल होणे आधुनिक काळाची गरज आहे का? कोणकोणते बदल आवश्यक आहेत, यांचाही परामर्श घेण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन समस्या विषय दुर्लक्षित विषयापैकी असून प्रस्तुत अभ्यासविषयाच्या या पैलूकडे विद्वानांनी फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. मुळातच 'पोलीस' या घटकाचा म्हणावा तितका अभ्यास झालेला

... पहा पृष्ठ 3

नाही. शिवाय स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात स्थापन झालेली पोलिसिंगच अद्यापही स्वातंत्र्योत्तर काळात चालू आहे. बदलत्या काळानुसार यात बदल होणे क्रमप्राप्त आहे. हा विषयच समाजाच्या आणि संशोधकांच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिलेला आहे. ब्रिटीशांच्या हिताची जपणूक करण्यासाठी ब्रिटीशांनी भारतीयांवर लादलेली पोलिसिंग आज स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याच स्वकियांवर लादणे योग्य आहे का? गुन्हेगारीवृत्ती आणि गुन्ह्याची पध्दती (Modus Operandi) यात प्रचंड फरक पडलेला असतांना सोळाव्या शतकातील पोलिसिंग कायम ठेवणे हितावह आहे का अशा अनेक प्रश्नांकडे पुरेशा गांभीर्याने पाहिले गेले नाही. काही विद्वानांनी या दृष्टीने संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी या विषयात संशोधनाला भरपूर वाव आहे.

स्वातंत्र्यपूर्व भारतातील पोलिसिंग आणि स्वातंत्र्योत्तर काळातील पोलिसिंग याबद्दल बरेच संशोधन वेगवेगळ्या पध्दतीने झालेले आहे. परंतु दोन्ही कालखंडातील पोलिसिंगचा समग्र अभ्यास करून त्यांच्यातील तुलनात्मक फरक तपासून पाहणे आणि आधुनिक काळानुसार त्यात काय बदल करणे आवश्यक आहे याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

ए.के. पांडे, एस.के. चॅटर्जी यांनी प्राचीन पोलिसिंगचा अभ्यास केला आहे. तर ब्रिटीशकालीन पोलीस व्यवस्था कशी होती याचा समग्र अभ्यास आनंदस्वरूप गुप्त, एस.व्ही. राव यासारखे इतिहास संशोधक करतात. अपर्णा श्रीवास्तव समाजामध्ये पोलिसांच्या बदलत्या भूमिकेविषयी लिहितात. डॉ. कापसे आणि कृष्णमोहन माथूर पोलीस प्रशासनाचा अभ्यास करतात, डॉ.पी.एल.जोशी नागपूर पोलिसांचा सूक्ष्म अभ्यास करतांना प्राचीन काळापासूनचा धांडोळा 'Nagpur Police through Ages' या ग्रंथात घेतात.

वरीलप्रमाणे आजपर्यंत पोलिसिंग या विषयावर वेगवेगळ्या पध्दतीने संशोधन झालेले असले तरी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय पोलिसिंगचे बदलते स्वरूप अभ्यासून येणाऱ्या काळासाठी आवश्यक बदल कोणते असू शकतात याचे दिशानिर्देशन करता येवू शकते. त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधक संशोधन करणार आहे.

प्रस्तुत संशोधन-अभ्यासासाठी जास्तीत जास्त अव्वल दर्जाच्या साधनांचा वापर केला जाईल. यात मुंबई, दिल्ली, विदर्भ पुराभिलेखागार नागपूर येथील उपलब्ध मूळ फाईल्स तसेच पोलीस खात्याशी संबंधित पोलीस महासंचालक कार्यालय, विभागीय पोलीस कार्यालये येथील कागदपत्रे, जीआर आणि शासकीय गॅझेटियर्स, विविध शासकीय प्रकाशने, संशोधन कालखंडातील वृत्तपत्रे, विविध संशोधकांचे ग्रंथ, ब्रिटीशकालीन पोलीस ठाणी आणि पोलीस मुख्यालयांतील दप्तर आणि तत्कालीन वस्तू आदि, स्वातंत्र्यपूर्व-स्वातंत्र्योत्तर काळातील पोलीस अधिकाऱ्यांनी केलेले ग्रंथलेखन यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाईल.

प्रस्तुत संशोधनाची तात्पुरती रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले:

ब्रिटीशकालीन पोलीस व्यवस्था-आरंभ, स्वरूप आणि कार्य.

प्रकरण दुसरे:

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय पोलिसिंग: विशेष संदर्भ महाराष्ट्र पोलीस

प्रकरण तिसरे:

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पोलिसांसमोरची आव्हाने आणि महाराष्ट्र पोलिसांचे बदलते स्वरूप.

...पहा पृष्ठ 4

प्रकरण चौथे:

स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्र पोलीस दलात झालेल्या सुधारणा.

प्रकरण पाचवे:

निष्कर्ष

प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये संबंधित प्रबंधाविषयीचे प्रास्ताविक असेल. यात समस्या विधान, विषय निवड, संशोधनाची आवश्यकता, अहवाल, प्रकरणांची योजना व संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा थोडक्यात आढावा घेतला जाईल. याशिवाय यामध्ये ब्रिटीशांचा हिंदुस्थानमध्ये झालेला प्रवेश आणि त्यांचे प्रशासकीय धोरण, त्यावेळची राजकीय, सामाजिक परिस्थिती, इतर प्रशासकीय बदल (विशेषत: संशोधन विषयाच्या संदर्भाने) याविषयी विश्लेषण करण्याचा अभ्यासकाचा प्रयत्न राहील.

प्रस्तुत संशोधन प्रबंधाचे पहिले प्रकरण 'ब्रिटीशकालीन पोलीस व्यवस्था: आरंभ, स्वरूप आणि कार्य 'असे असेल-

प्रकरण १ ले- ब्रिटीशकालीन पोलीसव्यवस्थेचा आरंभ, स्वरूप व कार्य:

ऋग्वेदकाळापासूनच भारतात कायदा व सुव्यवस्था राखणारी यंत्रणा अस्तित्वात होती. मौर्यकाळामध्ये तर गुप्तहेरांचे जाळे (विशेषत: स्त्रियांचे) पसरलेले दिसते. त्यानंतर गुप्त, वाकाटक, सातवाहन इ. काळामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणारी मजबूत प्रणाली कार्यरत असल्याचे दिसते. मध्ययुगीन कालखंडामध्ये मुस्लिम राज्यकर्त्यांनीही या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवल्याचे आढळून येते. अल्लाउद्दीन खिलजीने राबवलेले दारूबंदीचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

आधुनिक पोलीस व्यवस्थेची सुरूवात मात्र पाश्चात्य देशांमध्ये झाली. कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम राजाकडे किंवा केंद्रीय सत्तेकडे असावे की ते सरंजामदार, उमराव, नगरपालिकेसारख्या इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असावे यावर मूलभूत मतभेद झालेले दिसतात.

भारतात ब्रिटीशांचे आगमन इ.स. १६०० साली झाल्यानंतर ब्रिटीश सत्तेची पायाभरणी आणि सत्ताविस्तार झाला. त्याचाच एक भाग म्हणून पोलीस व्यवस्थेचा भारतात आरंभ झाला. त्यावेळची पार्श्वभूमी, पोलीस व्यवस्थेचे प्रारंभीचे स्वरूप, त्यांची कार्यपध्दती, त्यांना मिळालेल्या सोयीसुविधा, आलेल्या अडचणी इ. अनेक बाबींचा सखोल अभ्यास या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधक करेल या प्रकरणामध्ये आरंभीची पोलीसव्यवस्था, त्यांचे गणवेष, दळणवळणाची साधने इ. चा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण २ रे- स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय पोलिसिंग : विशेष संदर्भ महाराष्ट्र पोलीस

या प्रकरणामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय पोलिसांचा थोडक्यात अभ्यास करण्यात येईल. १९५६ च्या भाषावार प्रांत रचनेनंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यापुर्वी अस्तित्वात असलेल्या बॉम्बे इलाख्यामध्ये पोलीस व्यवस्था कशी होती इथपासून ते महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र पोलिसांचा इतिहास या प्रकरणामध्ये अभ्यासण्यात येईल. राष्ट्रीय स्तरावर स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये पोलीस व्यवस्था कशी होती याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल. त्यामध्ये विविध सुरक्षा दल, राष्ट्रीय पोलीस प्रबोधिनी, राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो, राष्ट्रीय अन्वेषण एजन्सी, रिसर्च अॅनलिसीस विंग इ ची निर्मिती व कार्य अभ्यासण्यात येईल. तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महाराष्ट्र पोलीस दलामध्ये नव्याने निर्माण झालेली

...पहा पृष्ठ 5

परिक्षेत्रे, पोलीस आयुक्तालये, पोलीस संशोधन आणि विकास संस्था, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पोलीस प्रशिक्षण संस्था यांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येईल. त्याचबरोबर ब्रिटीश कालीन पोलीस कायद्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेला बदल याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ३ रे- स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पोलिसांसमोरची आव्हाने आणि महाराष्ट्र पोलिसांचे बदलते स्वरूप.

स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या पोलीस विभागासमोर असलेली ध्येयधोरणे ही ब्रिटीशांच्या वसाहतवादी ध्येयधोरणास अनुकूल अशीच होती. ब्रिटीशांचे राज्य हिंदुस्थानमध्ये टिकवण्यासाठी पोलिसांचा उपयोग हर तऱ्हेने करण्यात आल्याचे दिसते. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मात्र भारतीय पोलीस दलाच्या ध्येयधोरणामध्ये अमूलाग्र बदल होणे अभिप्रेतच होते. त्यानुसार पोलीस विभागामध्येही बदल घडत गेले. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार अनेक नवनवीन समस्या पोलीस विभागासमोर उभ्या राहिल्या. राजकीयदृष्ट्या संघटीत नागरिक, अल्पसंख्यांक व विशिष्ट जाती जमातींच प्रश्न व संघटना, न्यायालयीन हस्तक्षेप, मानवाधिकार, प्रचार व प्रसार माध्यमे, शेतकरी-विद्यार्थी व कामगार आंदोलने, आतंकवाद इ. नवनव्या आव्हानांना सामोरे जातांना पोलिसांच्या कार्यपध्दतीमध्ये काय-काय बदल करण्यात आले, कोणते नवीन घटक स्थापन करण्यात आले. पोलीस आणि प्रसार माध्यमे, पोलीस आणि जनता यांमधील संबंध इ. चा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ४ थे- स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महाराष्ट्र पोलीस दलामध्ये झालेल्या सुधारण

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटीशांनी अंमलात आणलेल्या प्रशासकीय व्यवस्था बऱ्याचअंशी बदलण्यात आल्या. स्वतंत्र भारतीय संविधानाची निर्मिती झाल्यानंतर त्यानुसारच स्वतंत्र भारताचा प्रशासकीय कारभार सुरू करण्यात आला. भारतीय पोलीस व्यवस्थेमध्येही वेळोवेळी अनेक बदल करण्यात आले. उदा.- महिला पोलिसांची भरती. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये १९४७ ते आजतागायत पोलिसांचे गणवेष, त्यांचे वेतन व भत्ते इतर सोयीसुविधा, कर्तव्याचे स्वरूप, बदली व बढत्यांचे नियम इ. मध्ये टप्प्याने बदल होत गेले. त्या सर्व टप्प्यांचा विस्तृत अभ्यास या प्रकरणामध्ये घेण्यात येईल. त्या बरोबरच पोलीस दलामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,न्याय सहाय्यक विज्ञानाचा वापर यांचाही अभ्यास करण्यात येईल. महाराष्ट्र पोलिसांनी स्वत:च्या कार्यप्रणालीमध्ये स्विकारलेल्या नवनवीन योजना- उदा: शेजारधर्म कर्तव्य योजना, मोहल्ला समिती, कम्युनिटी पोलिसिंग, पोलिसांचे आधुनिकीकीण ज्यात आधुनिक शस्त्रास्त्रे व दारूगोळा, राष्ट्रीय गणकयंत्र दूरसंचार योजना, सीसीआयएस, सीसीटीएनएस,९ एएसी इ. चा अभ्यास करण्यात येईल. तसेच होमगार्डसारख्या सुरक्षा दलाचा पोलिसांच्या कार्यातील सहभाग यांचा अभ्यास करण्यात येईल. त्याचबरोबर राष्ट्रीय पोलीस आयोग, पद्मनाभय्या समिती, रिबेरो समिती, मल्लीमठ समिती, महाराष्ट्र पोलीस आयोग, मुगवे समिती, साठे समिती, नवरणे समिती, सराफ समिती, डॉ. मुजूमदार समिती इ. चा अभ्यास.

प्रकरण ५ वे - निष्कर्ष :

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या शेवटच्या पाचव्या प्रकरणाचे शिर्षक हे निष्कर्ष असे असेल. यात वरील चार प्रकरणांचा आढावा घेवून विविध विद्वानांची व संशोधकांची मते विचारात घेवून तसेच उपलब्ध साधनांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात चिकित्सक दृष्टीने निष्कर्ष काढला जाईल.

...*पहा पृष्ठ 6*

वरीलप्रमाणे प्रस्तुत संशोधन आराखड्यात प्रकरणांची मांडणी केलेली असून संशोधन प्रबंधात आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करण्यात येतील.

संशोधन पध्दती :

या विषयातील संशोधनासाठी संदर्भ संशोधन पध्दती व मुलाखत पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

संदर्भसूचि

१. थापर रोमिला,भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन,नवीदिल्ली,२००१.

२. देशमुख प्रशांत,इतिहास,विद्याभारती प्रकाशन, ऑक्टो.२००१.

३. मोरखंडीकर रा.शा.,कौटिल्य:अर्थशास्त्र परिचय, बहि:शाल शिक्षणमंडळ, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद,नोव्हें. १९६५.

४. मेहता जे.एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास,खंड पहिला, के.सागर पब्लिकेशन,जुलै २००४.

५. मेहता जे.एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास,खंड दुसरा, के.सागर पब्लिकेशन, आक्टो.२००४.

६. डॉ. पवार जयसिंगराव, भारतवर्षाचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास,मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर, मे.१९९५.

७.सरकार सुमित: आधुनिक भारत,राजकमल प्रकाशन,नवी दिल्ली,ग्यारहवी आवृत्ती,२००४.

८. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश म.रा.साहित्य व संस्कृ ती मंडळ,मुंबई,खंड दहावा,१९८२.

९. बिपीनचंद्र, आधुनिक भारताचा इतिहास

१०. Guha Jaytilal (Edi.), Policing A District

११. Dr. Kapse S.R., Modernisation of The Police for The Twenty First Century.

१२. Dr. Kapse S.R.,Police Administration.

१३. Narwane M.G., Police Directory

१४. The Indian Police Journal July-Sept. 2002.

१५. D.N. Gautam, What is wrong with Indian police?

१६. Chatterji S.K., The Police in Ancient India, The Indian police Journal, 1861.

१७. Gupta Anandswarup, The Police in British India 1961-1947, Concept 1979, New Delhi.

१८. Pandey A.K., Policing in Ancient India, The Indian police Journal vol. XXXII.

१९. Rao S.V., Police Under East India Company 1961.

(Original source various Archival Materials will be studied)

1. National Archives New Delhi.
2. Vidharbha Archives, Nagpur.
3. Mumbai Archives, Mumbai.
4. Beauro of Police Research & Development (BPRD), New Delhi.
5. CPR Pune
6. National Police Academy, Hydrabad
7. Maharashtra Police Academy, Nashik.
8. Office of The Director General of Police Deptt. Mumbai.
9. C.P. Govt. Gazetters of various years.
10. Bombay Govt. & Maharashtra Govt. Gazetters.
11. Direct Interviews of Police Officers of higher rank.